# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर शहरातील विविध ठिकाणी स्मार्ट सिटीतर्फे लावण्यात
**{ विद्युत विभाग }** आलेल्या व महानगरपालिकेच्या परिवहन विभागाचे अधिनस्थ असलेल्या बस थांब्यातील विद्युत व्यवस्थेत दुरुस्ती, सुधारणा व नविन जोडणी करुन अद्यावत करण्याबाबत.

नागपूर शहरातील विविध ठिकाणी स्मार्ट सिटीतर्फे लावण्यात आलेल्या व महानगरपालिकेच्या परिवहन विभागाचे अधिनस्थ असलेल्या बस थांब्यातील विद्युत व्यवस्थेत दुरुस्ती, सुधारणा व नविन जोडणी करुन अद्यावत करण्याकरीता रू. 38,47,922/- चे प्राकलन तयार करण्यात आले आहे. उपरोक्त विषयांकित कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा बोलावून काम करण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप:-** 1) सदर कामाचा खर्च पद क्र. B42080371101 अंतर्गत करावयाचा आहे.
2) सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 434/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 03/12/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरातील विविध ठिकाणी स्मार्ट सिटीतर्फे लावण्यात आलेल्या व महानगरपालिकेच्या परिवहन विभागाचे अधिनस्थ असलेल्या बस थांब्यातील विद्युत व्यवस्थेत दुरुस्ती, सुधारणा व नविन जोडणी करुन अद्यावत करण्याबाबत.

नागपूर शहरातील विविध ठिकाणी स्मार्ट सिटीतर्फे लावण्यात आलेल्या व महानगरपालिकेच्या परिवहन विभागाचे अधिनस्थ असलेल्या बस थांब्यातील विद्युत व्यवस्थेत दुरुस्ती, सुधारणा व नविन जोडणी करुन अद्यावत करण्याकरीता रू. 38,47,922/- चे प्राकलन तयार करण्यात आले आहे. उपरोक्त विषयांकित कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा बोलावून काम करण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.